0 7 OCT 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# माहिती अधिकार कायद्याची जनजागृती आवश्यक

## जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्त मनीषा देसाई यांचे मत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माहितीचा अधिकार कायद्याचे महत्त्व समाजातील अधिकाधिक घटकांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग टाळून समाजात या कायद्याबद्दल व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा देसाई यांनी केले.

जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्हा परिषद व शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंपर्क विभागामार्फत आयोजित कार्यक्रमात



कोल्हापूर : जि. प.च्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा देसाई यांचे स्वागत करताना डॉ. निशा मुडे-पवार. सोबत सहायक प्राध्यापिका डॉ. सुमेधा साळुंखे.

त्या बोलत होत्या. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव, सहायक प्राध्यापिका डॉ. सुमेधा साळुंखे आदी यावेळी उपस्थित होते.

प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले, तर आभार प्राजक्ता शहा यांनी मानले.

तरुण भारत

# एम. फिल., पीएच. डी. परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातील एम. फिल., पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत. विनाविलंब शुल्कासह ४ ते १३ ऑक्टोबर दरम्यान ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह १४ ते १७ ऑक्टोबर दरम्यान तर अतिविलंब शुल्कासह १८ ते २० ऑक्टोबर दरम्यान अर्ज भरावयाचा आहे. ऑनलाईन भरलेल्या विनाविलंब शुल्कासह अर्जांची प्रिंट १४ ऑक्टोबर, विलंब शुल्कासह अर्जांची प्रिंट १८ ऑक्टोबर तर अतिविलंब शुल्कासह भरलेल्या अर्जांची प्रिंट २१ ऑक्टोबरला परीक्षा विभागात जमा करावी.. एम. फिल., पीएच. डी. परीक्षा लेखी वर्णनात्मक पध्दतीने २३ नोव्हेंबरला होणार आहे.

07 OCT 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाळासाहेब देसाई अध्यासनाला गती देणार

## राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराजे देसाई यांची ग्वाही


प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या कामाला गती देण्यासाठी शासकीय तसेच व्यक्तीगत स्तरावर सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहे, अशी ग्वाही राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

मंत्री शंभूराज देसाई यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठात लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. देसाई यांच्या हस्ते लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

मंत्री देसाई म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे शिवाजी विद्यापीठाच्या उभारणीमधील योगदान अतुलनीय आहे. नव्या पिढीला त्यांचे उत्तुंग कार्य माहिती होण्याच्या



दृष्टीने या अध्यासनाच्या माध्यमातून विविध उपक्रमांमधून प्रयत्न होणे आवश्यक आहे. या अध्यासनासाठी मंजूर केलेला तीन कोटी रुपयांमधील उर्वरित अडीच कोटी रुपयांचा निधी तातडीने विद्यापीठाला दिला जाईल. विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालयात लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारे स्वतंत्र कलादालन निर्माण करावे. त्यासाठीही सर्वोतोपरी मदत केली जाईल. जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत निधीची तरतूद करण्याची सूचना मंत्री देसाई यांनी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांना दिली. अध्यासनाच्या प्रगतीसाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री दीपक केसरकर यांच्याबरोबर चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते मंत्री देसाई यांचा सत्कार केला. अध्यासनाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी अध्यासनाची माहिती दिली. यावेळी माजी आमदार सुजीत मिणचेकर, शिवराज देसाई, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, उच्च व तंत्रशिक्षण कोल्हापूर विभागाचे उपसंचालक हेमंत कठरे, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण भोसले, व्ही. जी. पानस्कर आदी उपस्थित होते.